दुष्काळ व दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या भागात आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत हाती घ्यावयाच्या तातडीच्या उपाययोजनांबाबत...

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन परिपत्रक क्रमांक : एससीवाय- २०१९/प्र.क.१२६/म-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २२ मार्च, २०१९

संदर्भ -

१) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय - २०१८/प्र.क्र.८९ /म-७, दिनांक ३१.१०.२०१८
२) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय- २०१८/प्र.क्र.८९ /म-७, दिनांक ६.११.२०१८
३) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय - २०१८/प्र.क्र.२१६ /म-७, दिनांक ८.१.२०१९
४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय - २०१८/प्र.क्र.८९ /म-७, दिनांक २१.२.२०१९

प्रस्तावना -

सन २०१८ च्या खरीप हंगामात राज्यातील जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्याने, संदर्भाधीन क्रमांक १, २ , ३ व ४ येथे नमुद केलेल्या विविध शासन निर्णयान्वये राज्यातील २६ जिल्ह्यांमधील १५१ तालुक्यात, या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त २६८ महसुली मंडळांमध्ये दुष्काळ तसेच,या क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील ९३१ व ४५१८ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. सदर भागामध्ये दुष्काळी भागातील जनतेसाठी विविध सोया सुविधा लागू करण्यात आलेल्या आहेत.

शासन परिपत्रक -

दिनांक १०.३.२०१९ पासून लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सदर आदर्श आचारसंहितेच्या कालावधीमध्ये दुष्काळ व दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या भागामध्ये हाती घ्यावयाच्या विविध उपाययोजनांसदर्भात पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

२. भारत निवडणूक आयोगाने मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या Manual on Model Code of Conduct मधील प्रकरण क्रमांक ५ मध्ये खालीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत:

Paragraph 5.4.3 ***. Implementation of relief work in drought affected areas:-***

During 2004 general elections, the Election Commission approved the following modalities of implementing relief work in areas which have been declare as "drought affected" (Annexure VIII)

(i) The drought relief works by way of immediate relief measures to be taken up by the State Governments shall only be in the areas which have been declared as " drought affected" within the parameters laid down under the guidelines for managing of Calamity Relief Fund by the Central Government. No new areas are to be added to the existing list of such "drought affected" areas after the announcement of elections on February 29th, 2004. Addition of any additional area/village will only be subject to obtaining prior concurrence of the Commission after following the due procedure laid down for seeking assistance under the Calamity Relief Fund/National Relief Fund laid down by the Government of India for operation of such funds.

(ii) To provide immediate relief in the areas declared as drought affected, the Commission has provisionally approved the following measures :-

(a) Provision of drinking water by way of water tankers

(b) Digging of bore-wells as well as dug-wells in scarcity areas on account of drying of the existing bore-wells/dug -wells.

(c) Provision of rice/wheat at prescribed rates for distribution among the destitute without support and who can not go for work as per mechanism already prescribed in the Calamity Relief Fund Scheme.

(d) Provision of fodder for cattle

(e) New works on wage employment (Food for work etc) where such existing works have been completed

(iii) No Minister of the Government or a political functionary will be associated in the management of the drought relief operations in any capacity, supervisory or otherwise.

(iv) The entire relief operation would be taken up by the Division, District and Taluka/sub-District Administration without involving elected representative and /or non-officials at any level

३. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या उपरोक्त सुचना विचारात घेता, संदर्भाधीन शासन निर्णयान्वये खरीप २०१८ हंगामात दुष्काळ किंवा दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेल्या राज्यातील भागामध्ये दुष्काळी परिस्थितीचे सौम्यीकरण करण्याच्या दृष्टीने या भागातील जनतेसाठी हाती घ्यावयाच्या विविध उपाययोजनेसंदर्भात आदर्श आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

१. दिनांक २५.१.२०१९ व त्यातरच्या शासन आदेशानुसार दिलेल्या सुचनांप्रमाणे जनावरांच्या छावण्या सुरू करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी वस्तुनिष्ठ निकष लावून

स्थानिक परिस्थिती व गरज विचारात घेवून जनावरांच्या चारा छावण्या सुरू करण्यास मान्यता दयावी. चारा छावण्या सुरू करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री यांची मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

२. दुष्काळ किंवा दुष्काळसदृश्य भागामधील पाणी टंचाई विचारात घेवून स्थानिक गरज व परिस्थिती पाहून गरजेनुसार टँकर सुरू करण्यात यावेत. या प्रक्रियेमध्ये पालकमंत्री/ लोकप्रतिनिधी/ अशासकीय सदस्यांची मान्यता घेण्यात येऊ नये .

३. दुष्काळ किंवा दुष्काळसदृश्य भागामधील पाणी टंचाई विचारात घेवून नवीन विंधण विहीरी घेण्याबाबत स्थानिक परिस्थिती व गरज पाहून जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावा. या प्रक्रियेमध्ये पालकमंत्री/लोकप्रतिनिधी/ अशासकीय सदस्यांची मान्यता घेण्यात येऊ नये.

४. दुष्काळ किंवा दुष्काळसदृश्य भागामध्ये मनरेगा योजनेअंतर्गत रोजगार निर्मितीसाठी हाती घेतलेली कामे पूर्ण झाल्यानंतर स्थानिक मागणी व गरज विचारात घेवून नवीन कामे घेता येतील. या प्रक्रियेमध्ये सुध्दा पालकमंत्री/लोकप्रतिनिधी/ अशासकीय सदस्यांची मान्यता घेण्यात येऊ नये.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०३२२१३०८२५३३१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.03.22 13:22:50 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई ,
२. मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
४. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय,मुंबई,
५. प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय,मुंबई,

६. प्रधान सचिव (रोहयो) मृदू व जलसंधारण विभाग , मंत्रालय,मुंबई

७. प्रधान सचिव/सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय,मुंबई

८. प्रधान सचिव/सचिव (अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग),मंत्रालय,मुंबई

९. विभागीय आयुक्त,कोकण/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती/नाशिक

१०. सर्व जिल्हाधिकारी

११. मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा

१२. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

१३. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

१४. निवड नस्ती (कार्यासन - म/७).